धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे

संदर्भ क्र.________________ दिनांक : २२/०२/२०१६

प्रसिध्दीकरिता

## मासुंदा तलावावरील ॲम्फी थिएटर म्हणजे 'तळ्यात मासा आणि घरात भरवसा' !
## 'धर्मराज्य पक्षा'ची मुख्यमंत्र्यांवर टीका

ठाणे (प्रतिनिधी), दि. २२ – ठाण्यात नुकत्याच संपन्न झालेल्या ९६व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, मासुंदा तलावावर ॲम्फी थिएटर उभारणार असल्याचे आश्वासन ठाणेकर नागरिकांना दिले असले; तरी, मुख्यमंत्र्यांचे हे विधान म्हणजे **'तळ्यात मासा आणि घरात भरवसा'** या प्रकारचे असल्याची टीका **'धर्मराज्य पक्षा'**ने केली आहे. मुळात ठाण्यात संपन्न झालेले नाट्यसंमेलन हे सांस्कृतिक नव्हतेच; तर, ते राजकीय प्रतिष्ठा पणाला लावण्यासाठी आणि श्रेयवादाच्या लढाईत कोण सरस ठरतो हे दाखविण्यासाठीच आयोजित करण्यात आले होते का? असा थेट सवालदेखील **'धर्मराज्य पक्षा'**चे ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर यांनी मुख्यमंत्री व ठाणे महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांना विचारला आहे. एकेकाळी तलावांचे शहर अशी ओळख असणाऱ्या ठाणे शहराचा अभिमानास्पद वारसा आता लुप्त होत चालला असून, ठाण्याचे हृदय असणाऱ्या मासुंदा तलावासहित मखमली आणि सिध्देश्वर तलावाची अवस्था पाहावत नाही, इतकी बिकट झालेली असतांना, मासुंदा तलावावरील ॲम्फी थिएटरची भेट म्हणजे ठाणेकरांच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार असल्याचे तिखट वक्तव्य राजेश गडकर यांनी प्रसिध्द केलेल्या पत्रकात केले आहे.

दरम्यान, ठाण्यातील नाटयसंमेलन राजकीयदृष्ट्या गाजले असले; तरी, ठाणे महानगरपालिका प्रशासनाने शहरातील दोन नाट्यगृहांच्या उभारणीकरीता एक दमडीदेखील ठेवलेली नाही. ठामपाच्या अर्थसंकल्पात याबाबतची कोणतीही तरतूद नसल्याने, ठाण्यातील नाट्यप्रेमी कमालीचे नाराज झाले असल्याचेही गडकर यावेळी पुढे म्हणाले. निव्वळ नाट्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते; म्हणूनच, मासुंदा तलावाची तात्पुरती डागडुजी आणि रंगरंगोटी करण्यात आली होती. मुळात तलावाची दुरवस्था झाली असून, तलावाच्या काठावर उंदीर आणि घुशींच्या असंख्य बीळांमुळे संरक्षण भिंतच धोकादायक बनली आहे. ते कमी की काय म्हणून, फेरीवाल्यांकडून करण्यात येणारा कचरा आणि टांगेवाल्यांच्या घोड्यांची रस्त्यात पडणारी लीद यामुळे परिसरात नेहमीच दुर्गंधीचे साम्राज्य असते. शिवाय, मखमली तलावाच्या पाण्यात निर्माण झालेले शेवाळ, नियमबाह्य बांधण्यात आलेली संरक्षण भिंत तसेच, सिध्देश्वर तलावाच्या भोवताली उभ्या राहीलेल्या हजारो अनधिकृत झोपडपट्ट्या यामुळे तलावाच्या मूळ नैसर्गिक स्त्रोतालाच धोका निर्माण झालेला असतांना, केवळ निवडणुका डोळयासमोर ठेऊन मासुंदा तलावावरील मुख्यमंत्र्यांची ॲम्फी थिएटरची घोषणा म्हणजे, **'तळयात मासा आणि घरात भरवसा'** असाच प्रकार असल्याचा पुनरूच्चार **'धर्मराज्य पक्षा'**चे ठाणे लोकसभा अध्यक्ष राजेश गडकर यांनी प्रसिध्दी पत्रकात शेवटी केला आहे.

------@@@------

ए/ए२०३, 'पांचजन्य'-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, 'पांचजन्य', शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*"सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!"...*